

‘बच्चन’

# मधुशाला

अनुवाद

तारा भवाळकर

डॉ. तारा भवाळकर
सांगली -
स्थळप्रत

# मधुशाला

बच्चन

इंडिया
बुककंपनी

इंडिया बुक कंपनी, पुणे ३०

: अनुवाद :
तारा भवाळकर

०

: प्रकाशक :
अनंत लक्ष्मण वल्लाळ
इंडिया बुक कंपनी
१२७५ सदाशिव पेठ
बाजीराव रस्ता
पुणे ४११ ०३०

०

© प्रा. तारा भवाळकर

०

: प्रथमावृत्ती :
१ जून १९७९

०

: मुखपृष्ठ :
अनंत सालकर

०

: मुद्रक :
सौ. कमल रामचंद्र वळसाली
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०



श्री. बच्चन

हिन्दी काव्य-रसिकांचा सर्वांत प्रिय कवी आहे 'बच्चन!' आणि त्यांची 'मधुशाला' तर गेली तीस वर्षे लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान झालेली आहे. १९३५ मध्ये प्रथम प्रकाशित झाल्यापासून आजपर्यंत या संग्रहाच्या बावीस आवृत्ती निघाल्या असून सुमारे दोन लाख प्रती वाचकांपर्यंत पोहचल्या आहेत. महाकवी पंतजींच्याच शब्दात सांगायचे झाले तर 'मधुशाले'ची मादकता अक्षय आहे.

'मधुशाला' काव्यात मदिरा, पेला, मधुबाला आणि मधुशाला या चार प्रतीकांच्या माध्यमातून कवीने अनेकानेक क्रान्तिकारक, मर्मस्पर्शी प्रणयभाव आणि गूढभाव शब्दबद्ध केले आहेत.

'मधुशाला' काव्याची धुंदी आणि मादकता यांत हरवून जाण्यासाठी रसिकांना हे आग्रहाचे निमंत्रण आहे.

# संबोधन

प्रियतम,

त्या दिवशी उमर खैय्यामची भाव-पुष्पं माझ्या शब्दांच्या धाग्यात गुंफून मी तुझ्या चरणी वाहिली होती. ती पाहून तू प्रसन्न झालास. तुझ्या एका भक्तानं तुझ्या एका आज्ञेचं पालन केलं म्हणून तू प्रसन्न झालास खरा; पण माझ्या मनाचं मात्र समाधान झालं नव्हतं. परक्याची वस्तू आपल्या पूजापात्रात घेऊन तुझ्या मंदिरात येताना माझ्या मनाला किती संकोच वाटत होता, हे तुला कसं कळणार! ती भावपुष्पं आणण्याची तुझी आज्ञा नसती आणि केवळ स्वेच्छेनंच आणण्याचा माझा प्रयत्न असता, तर कदाचित रस्त्यातच मी संपून गेलो असतो. पण तुझी आज्ञा आणि आनंद या विचारांनीच मला तुझ्यासमोर येणं भाग पाडलं. अर्थात भक्त भगवंताला भेट देतो तो काही त्याच्या प्रसन्नतेचा विचार करून नव्हे; आणि हे सांगण्यात मला माझं काही नुकसान आहे असंही वाटत नाही. भगवंताला परमानंद व्हावा, अशी काही वस्तू आपण त्याच्या चरणी अर्पण करू शकू असं त्या दीन, हीन, निर्धन भक्ताच्या मनात येणं तरी कसं शक्य आहे? केवळ आपल्याच मनाच्या समाधानासाठी तो त्याच्या चरणी आपली भेट अर्पण करीत असतो. भगवंताच्या चरणी काही तरी वाहून भक्तच आपल्या हृदयावरचा भार हलका करीत असतो, मनावरचं ओझं उतरवीत असतो. परक्याची फुलं तुझ्या चरणी वाहात असताना त्या दिवशी माझ्या हृदयावरचा भार हलकाही झाला नाही आणि माझ्या मनाचं समाधानही झालं नाही.

माझं हे म्हणणं ऐकल्यावर तुझ्या लक्षात येईल की, तुझ्या आनंदात आनंद न मानणारा मी किती स्वार्थी आहे ते! आनंद तर मला झालाच. आपल्या आराध्यदैवताच्या अधरावर प्रसन्नतेची स्मितरेषा पाहताना कोणत्या भक्ताला परमानंदाचा स्पर्श होणार नाही? पण आनंद आणि प्रसन्नतेसाठीच केवळ भक्ताचं हृदय व्याकुळ झालेलं नसतं. प्रसन्नता ही आत्मचैतन्याची एक अनुभूती आहे. आत्मार्पणातच तर भक्ताला

हर्ष-विषादापलीकडची विस्मृती सापडते. अरे! हे 'मी'पणाचं ओझं! हे फेकून देण्याची ही आतुरता! या महान त्यागातही स्वार्थाची सत्ता! किती अपूर्ण आहे नाही हे मानवी जीवन! आमच्या महान त्यागातही आमचा महान स्वार्थ आहे. या त्यागस्वार्थाच्या भावनेवरच तर संस्कृतीचा पाया दृढपणे उभा आहे.

मेघ आपलं 'मी'पण अनंत बिंदूंमध्ये, बिंदू आपलं 'मी'पण जलधारा आणि नदीप्रवाहांमध्ये, आणि नद्या आपलं 'मी'पण सागरात लुप्त करण्यासाठी आतुर आहेत; आणि ज्याच्या चरणी आपला संपूर्ण जलनिधी अर्पण करून रिकामं व्हावं अशा कुणाच्या शोधात तर तो सागरही सदैव क्षुब्ध असतो. पृथ्वी आपलं 'मी'पण अगणित वृक्ष–लता–रोपट्यांमध्ये, वृक्ष–लता–रोपटी आपलं 'मी'पण कळ्या–फुलांमध्ये, कळ्या–फुलं आपलं 'मी'पण सुगंध-वायुलहरींमध्ये मिसळून टाकण्यासाठी व्याकुळ आहेत. आणि तो पदर एकदा— फक्त एकदाच झुलवून लोपून जावं, अशा कोणाला तरी धुंडाळत तो वायू तर सतत अस्थिर होऊन भटकतो आहे. पतंग आपलं 'मी'पण दीपकासमोर, दीपक आपलं 'मी'पण रजनीसमोर, आणि ती रजनी– शशी-तारक-मणिमंडित अशी ती रजनी सूर्याच्यासमोर आपलं 'मी'पण अर्पण करण्यासाठी व्याकुळ आहे. आणि तो सूर्यसुद्धा जिच्यावरून आरती ओवाळून विझून जावं अशा कोण्या एका महज्ज्योतीच्या प्राप्तीसाठी तपश्चर्या करतो आहे.

त्याचप्रमाणे कोणाच्या कानी एक क्षणभर गुंजन करून विशाल नभात क्षीण होऊन विरून जाण्यासाठी वादक आपलं 'मी'पण स्वरातून प्रकट करू पाहतो. कोणाच्या नेत्रांमध्ये पळभर का होईना प्रतिबिंबित होऊन, अंधुक होऊन अंतर्धान पावण्यासाठी चित्रकारही आपलं 'मी'पण रंग-रेखांमधून प्रकट करू इच्छितो. एक क्षणभर का होईना, कोणाच्या तरी कोमल तळव्याचा स्पर्श व्हावा आणि मग खंडित होऊन धरतीवर विखरून पडावं म्हणून शिल्पकारही आपलं 'मी'पण पाषाणमूर्तींमध्ये व्यक्त करण्याची अभिलाषा धरतो. आणि कोणाच्या अंतःकरणाला अतिवेगानं हळुवार स्पर्शून जगाच्या घनदाट कोलाहलात लपून जाणाऱ्या सजीव शब्द-काव्यांमध्ये कवीही आपलं 'मी'पण अभिव्यक्त करू पाहतो.

हं! तर या स्वार्थी माणसांच्या– त्यांत मीही एक आहेच– सर्वश्रेष्ठ अभिलाषा, आत्मानंद नाही– आत्मसमर्पण आहे! मला त्या दिवशी हे सद्‌भाग्य मिळालं नाही. म्हणून तर माझं ' मी 'पण घेऊन इतक्या लौकर आज पुन्हा तुझ्या पायाशी आलो आहे. या अनिवार स्वार्थासाठी मी तुझ्याजवळ क्षमेची भीक मागतो. माझी खात्री आहे, मी निराश होऊन परतणार नाही; कधी परतलोही नाही.

आज मदिरा घेऊन आलो आहे.— मदिरा! जिच्या प्राशनानं भविष्यातली भयं पळून जातात आणि भूतकाळातली दारुण दुःखं दूर होतात; जिच्या प्राशनानं मानापमानाचं भानच राहात नाही आणि गौरवाचा गर्वही लोपून जातो; जी ओतल्यानं माणसाला आपल्या जीवनातली व्यथा वेदना आणि संकटं काही जाणवतच नाहीत आणि माणूस श्रम, संकटं, ताप सगळं विसरून जातो! अरेरे! –जीवनाची मदिरा! जी अगतिक होऊन प्यावीच लागते— खरंच किती कडू आहे नाही ही! किती? ' ही ' मदिरा ' त्या ' मदिरेची नशा उतरवील. जीवनाची वेदनामय जाणीव विस्मृतीच्या गर्तेत लोटील आणि बलशाली दैव, दुर्दम्य काळ, कठोर कर्म आणि निर्दय नियतीच्या क्रूर, कठोर आघातापासून रक्षण करील. क्षीण, क्षुद्र, क्षणभंगुर, दुर्बल मानवाजवळ जग-जीवनाच्या सगळ्या आधिव्याधीं-वरची हीच एक महौषधी आहे. आज तुला हिची गरज आहे; असं माझं मनच मला सांगतंय. घे!– पी! आणि विसरून जा आपलं दुःख, दुःखाचा काळ आणि काळाची कठिण चक्रं– सगळं सगळं विसरून जा! घे! पी आपल्या जीवनातला नवउल्हास, नवी स्फूर्ती आणि उत्साह या मदिरेनं तुडुंब भरून घे. अरेरे! दुसऱ्यांना मदोन्मत्त करणारा असा मी किती निराशांचा पुंज आहे, हे तरी कुणाला माहीत आहे? कुणाला माहीत की दुसऱ्यांना शीतलता देणारा स्वतः किती भीषण ज्वालांमध्ये जळत असतो ते!

माझ्या हृदयाची मदिरा आहे ही! तू एकटाच जळतोस असं नको समजूस! तू जळतोस, पण त्याचा प्रभाव माझ्यावर पडतो. तू जळतोस आणि मी विरघळतो, तू तापतोस, आणि मी वितळतो. शीतल-मधूच्या शोधात तर मीही आलो होतो; पण तू मला तुझं हृदय दिलंस, हृदयाची

ज्वाला दिलीस, तुझ्या ज्वालेनं माझ्या हृदयाची ही मदिरा विरघळून प्रवाहित होत आहे. घे ना! आणि पिऊन आपला हृदयाग्नी शांत कर! काल जे हृदय मदिरेचं तहानलेलं होतं ते आज तहान शमविणारी मदिराच झालं आहे.

कवीचं हृदय हे केवळ कवीचंच नसतं. त्रिकाल आणि त्रिभुवन त्या हृदयात निद्रावश होतात. दूधबाळीसारखी सृष्टीही तेथे क्रीडा करते आणि अवखळ बालकासारखा प्रलयही तेथे उत्पात घडवतो. आकाशाचं गाणं, वायूचं हसणं आणि सागराचं रडणं यांनीच त्याचं हृदयांगण प्रतिध्वनित होतं. जन्म, जीवन-मरण अविरत गतीनं त्याच्याच हृदयमंदिरात नृत्य करतात. आज त्याचं हृदय विरघळताच सगळं विश्व मादक मदिरेनं म्हणूनच तर चिंब झालं आहे. जल-स्थल, गगन-पवन, सिन्धुवसुंधरा, स्वर्ग-नरक, जड-चेतन, रात्र-दिवस, वन-उपवन, सर-सरिता, मीलन-विरह, प्रणय-संघर्ष, आशा-निराशा, जन्म-जीवन, काल-कर्म – या विश्वातील सगळ्याच गोष्टी आज मदिरा-चषक— सगळंच मधुशालामय झाल्याचा भास होतो आहे.

प्रियतम, पाहा ना! सगळी प्रकृतीच मधुशाला होऊन झुलते आहे. ये, तू पुरुष हो आणि मी मायारूपिणी चंचला साकीबाला होईन. आपल्या हातानं चषक भरभरून मी तुझ्या ओठाशी आणीन आणि तू अनंत पिपासू होऊन अनंत काल प्राशन करीत राहा. मी पाजताना कंटाळणार नाही आणि तू पिताना थकू नकोस.

भगवन्! क्षमा, क्षमा, क्षमा! अरे! माझं हे मृण्मय पात्र तुझ्या ज्योतिर्मय अधरांशी घेऊन येण्याचं माझं हे धाडस! माझ्या औद्धत्याला क्षमा कर. माझे हात कापत आहेत, चषक थरथरतो आहे, माझी मदिरा सांडते आहे; अरे, पायही कापत आहेत... देहाचा कण न् कण रोमांचित होतो आहे .. अरे मी कोसळले...!!

तरीही माझी मदिरा तुझ्या चरणी समर्पित झालीच. मी खूप समाधानी आहे. भक्ताची ही मदिरा! विनम्र भक्ताची ही मदिरा, परमात्म्याच्या ओठाशी नव्हे चरणांवरच समर्पित होणं अधिक उचित आहे. मी वर पाहते ना! हे काय? तुझ्या नेत्रांत हा उन्माद कसला? उन्मत्तता कसली?

मस्ती कसली ? तुझे ओठ हलताहेत ? तू हसतोस काय म्हणून ? काय ? तू काही म्हणतोस काय ? काय ? हेच ना, की—

**सुरा प्राशुनी धुंदी — ही का**
**रीत असे मधु-प्रीतीची ?**

हे काय ? माझ्या मदिरापानाच्या अभिलाषेनंच तू एवढा प्रमत्त झालास ? धन्य तू आणि धन्य मी !

पण तुझ्या त्या मदिरनेत्रांनी तू माझ्याकडे पाहू नकोस ना ! बघ माझं मन कसंसंच होतंय ! बघ मी डोळे मिटून घेते झालं !

बाई ग ! त्या मदिरनेत्रांकडे पाहवतही नाही आणि पाहिल्याशिवाय राहवतही नाही. पुन्हा एकदा त्यांच्याकडे पाहते.

अरे, अरे ! पण ते मादक नेत्र गेले तरी कुठं ? ते मादक दृश्य कुठं गेलं ? आता शोधू तरी कुठं ते ? पण का ?

नाही शोधणार मी ते !

मला अनंत काळ मस्तीत ठेवील, त्या मादक नयनांचा एकच कटाक्ष ! भक्ताला हवी असते सागराची तहान आणि बिंदूनं समाधान !

तुझ्या मदिरधुंद नेत्रांची मदिरा सदैव माझ्या पापणीच्या पेल्यात ओसंडत राहू दे आणि जो जो म्हणून मला पाहील तो तो तुझ्या मदिरेनं धुंद होऊ दे !

तुझ्या मदिर-नेत्रांच्या
निरंतर ध्यानात—
'मी'
(बच्चन)

प्रयाग,
२७ ऑगस्ट १९३३

१

मधुर भावना द्राक्षफलांची
आणिलि गाळुन मी मदिरा
माझ्या हाताने मी प्रियतम
तुजला पाजिन हा पेला.

नैवेद्यार्पण तुला प्रथम, मग
प्रसाद देइन जगताला

तुझेच सुस्वागत प्रारंभी
करिते माझी 'मधुशाला!'

२

तृषा जर तुला, विश्व तापवुनि
गाळुन आणिन मी मदिरा
नृत्य करिन मी एके चरणी
हाती घेउन हा पेला.

जिवित-मधु तुज अर्पण करुनी
मी केव्हाचा टाकियला

ओवाळुन तुजवरुनी टाकिन
आज जगाची 'मधुशाला!'

३

प्रियतम मदिरा माझि तूच गे
तृषित तुझा ग मी पेला
माझ्यामध्ये भरुन तुला– तू
होसी मग प्राशनकर्ता.

मी भरभरुनी तुजला देतो
धुंद पिउन तू मज होसी

मजसाठी तू, मी तुजसाठी
आज परस्पर ‘ मधुशाला ! ’

४

मधुर भावना द्राक्षलतेतुन
खेचुन कल्पकता मदिरा
साकीवेशे कवि अवतरला
भरून कवितेचा पेला.

क्षणभरही हा रिता न होइल
पान करो लाखोगणती

रसीक वाचक प्राशनकर्ते
कविता माझी ‘ मधुशाला ’

५

मधु-भावांची मधुर-मधुरतम
नित्य गाळितो मी मदिरा
या मदिरेने तुडुंब भरतो
आसुसला हा मन-पेला !

कल्पकतेच्या करात घेउनि
स्वतःच प्राशन करितो मी

माझ्यातच माझा मी साकी
प्राशनकर्ता ' मधुशाला '

६

निघे घरातुन मदिरालयि तो
जाण्यासाठी प्राशनकर्ता
' मार्ग कोणता ' उमगेना मग
गोंधळतो बापुडवाणा.

भिन्न भिन्न पथ लोक दाविती
एक गोष्ट पण ऐक गड्या

एक पथाने चालु लाग मग
आपसूक लाभे ' मधुशाला '

७

पायपीट करण्यातच जीवन
व्यर्थ किती मी घालविले
" दूर अजूनी " हेच मला
दर वाटाड्याने सांगितले

धाडस नाही जाण्यासि पुढे
साहस फिरण्याचेहि नसे

किंकर्तव्य-विमूढ करूनी
दूर उभी ती ' मधुशाला ! '

८

जप सदैव कर तूच मुखाने
' मधु, मदिरा, मादक मदिरा. '
हातामध्ये समज असे रे
एक ललित कल्पित पेला.

ध्यास नित्य लागो मनास तव
सुंदर साकीबालेचा

आणि उचल पाऊल यात्रिका
दूर न भासे ' मधुशाला ! '

९

अभिलाषा नित मधुपानाची
साक्षात् जेव्हा हो मदिरा
अधिऱ्या अधिरांचाच ज्या क्षणी
भासित होई मधुपेला.

आन्तरश्वासामधुनी जेव्हा
साकी साक्षात् येइ प्रिये !

साकी, बाकी चषक न मदिरा
मिळेल साक्षात् ' मधुशाला '

१०

कल कल छल छल ओसंडत ती
सुरईतुनि पेल्यात सुरा
रुण झुण रुण झुण ऐक— बघ सुरा
वितरत ही साकीबाला

आलोच पहा; दूर न, अंतर
चार पावलांचेच असे

कूजन करिती मद्यपी इथे
सुरभित होई ' मधुशाला ! '

११

जलतरंगध्वनि भासे, चुंबन–
दोन चषक करिती तेव्हा
वीणेचा झंकार, चालते
रुणझुण रुणझुण ‘ मधुबाला ’

दमदाटी करि मधुविक्रेता
पखवाजाचा ध्वनि भासे

सुमधुर ध्वनिचा मेळ वाढवी
मधु, मादकता ‘ मधुशाला ! ’

१२

मेंदि सुरंगित मृदुल करामधि
माणिकमंडित मधु पेला
अंगुरवर्णी अवगुंठित ही
कनककायि साकीबाला.

पैंजण चरणी, नीलाभरणी
मग्न मधू-मद्यपि झाले

इंद्रधनूची स्पर्धक जणु ही
आज सुरंगित ‘ मधुशाला ! ’

१३

करामधे येण्याच्या आधी
नखरा दाविल मधुप्याला
अधरावर जाण्याच्या आधी
विभ्रम दाविल मधु-मदिरा.

फिरफिरुनी लटके मुरके
येण्याआधी देइल साकी

बावरू नको पथिका, आधी
अनमान करी ' मधुशाला ! '

१४

लाल सुरेची धार अग्निसम
म्हणू नको रे तिज ज्वाला
फेस फसफसे म्हणून इजला
म्हणू नको हृद्घाव सख्या.

पीडा– बेहोशी मदिरेची
गतविस्मृति साकीबाला

हृदयशूल ज्या आल्हाद तया
निमंत्रिते मम ' मधुशाला ! '

२

१५

दुनियेच्या शीतल मदिरेसम
नसे यात्रिका मम मदिरा
दुनियेच्या शीतल चषकासम
चषक यात्रिका नच माझा.

तप्त सुरेच्या जळत्या चषकी
जळत्या हृदयाची कविता

कधी न भय आगीचे मानी
निर्भय माझी 'मधुशाला!'

१६

पाहिलीस मधुधार सुरेची
आज पहा रे तज्ज्वाला
पहा, आज हा चषक फेकितो
जाळितसे जो अधरांना.

'ओठच का? हा देह जळो पण
बिंदु दोन प्राशण्या मिळो'

प्रिय-जनांस मदिरेच्या ऐशा
आज निमंत्री 'मधुशाला!'

१७

धर्मग्रंथ होळीत जाळले
ज्या हृदयांच्या ज्वालेने,
मशीद, मंदिर, प्रार्थनाघरे
खंडित केली वेड्याने.

पंडित, मोमिन, पादरि यांचे
पाश जयाने तोडियले

मुक्त तयांचे आज करितसे
स्वागत माझी ' मधुशाला ! '

१८

आसुसल्या ओठांनी ज्याने
हाय ! न चुंबियली मदिरा
हर्षथरकत्या हाती ज्याने
हाय न धरिला मधु-पेला.

हात धरुन लाजऱ्या साकिला
जवळ न ज्याने ओढियले

जीवनशाखा व्यर्थ सुकविली
त्याने मधुमय ' मधुशाला ! '

१९

प्रणयीजन साकीचे पुजती
गंगाजल पावन मदिरा
अखंड गतिमय फेर फिरविते
मधुचषकाची ही माला.

“ये घे, आणिक पी रे– पी रे!”
मंत्र हाच रे जपत असे

शिवमूर्ती साक्षात् होइ मी
देवालय ही ‘मधुशाला!’

२०

मंदिरात ना वाजे घंटा,
पुष्पहार ना मूर्तीला
घरात अपुल्या बसे मुअज़्ज़िन
मशीदीस लावुन टाळा.

नगरपती धनिकांचे लुटले
खजिने आणिक गड–किल्ले

सुखी सदा पण असो मद्यपी
सदा मुक्त अन् ‘मधुशाला!’

२१

थोर घराणी अशी उधळली
कोणि न उरला रडण्याला
महाल झाले उजाड, जेथे
लचकत होत्या सुराङ्गना.

राजपाटही उधळुन गेले
भाग्यश्री झोपी गेली

तरी मद्यपी असेच येतिल
जागृत राहिल ' मधुशाला ! '

२२

सरेल सारे, परंतु राहिल
सुंदर साकी, यम काळा
आटुन जातिल सर्व सुरस, पण
टिके हलाहल अन् मदिरा.

थाटमाट अन् चैतन्याची
स्थानेही नीरव होती

स्मशान जागृत सदाच राहिल
अन् चिर जागृत ' मधुशाला ! '

२३

सदाच दोषी गणला जगती
छंदि-फंदि चंचल पेला.
रसिक साकि, चंगी-भंगी अन्
सैरभैर प्राशनकर्ता.

विषम-युग्म मधुशाला अन् जग
जुळेल त्यांचे का कोठे ?

क्षीणकाय जग जर्जर प्रतिपळ
सदाच नूतन ' मधुशाला ! '

२४

दोष देइ जो मधुशालेला
पिण्याआधि, तो शुद्ध खुळा
एकदाच त्या स्वाद घेउ दे
होइल बडबड बंद सदा.

स्वामी-सेवक दोघांमध्ये
विजय चषक अन् मदिरेचा.

विश्वविजयिनी होउन जगती
आली माझी ' मधुशाला ! '

२५

उसळताति मदिरालयि ऊर्मी
जगि पसरे संकटछाया
मरणकळा मग तेथे दाटे
हर्षोत्सव येथे फुलला.

स्वर्गातुन ही थेट उतरली—
धरतीवर, मग शोक कसा ?

शोकगीत जग गाते तेव्हा
करी दिवाळी 'मधुशाला !'

२६

वर्षामध्ये एकदाच जगि
होळीच्या ज्वाला उठती
स्पर्धा लागे एकदाच अन्
दीपमालिका प्रज्वलती.

मित्रांनो ! एखाद्या दिनि तरि
मदिरालयि येऊन पहा

हरदिन होळी, निशीं दिवाळी
नित्य करितसे 'मधुशाला !'

२७

कोण न जाणे ! मानव येथे
जन्मजात मद्यपि झाला
कोण न जाणे ! साकीस; जिने
दूध पाजुनी वाढविला.

जीवन अन् पेयाच्या धुंदित
मस्त मानवा राहू दे

याचसाठि या जगती त्याने
प्रथम मिळविली ' मधुशाला ! '

२८

द्राक्षलता या सदा राहु दे
ज्यांपासुन मिळते मदिरा
तशीच ही माती राहू दे
ज्यापासुन घडतो पेला.

मदिर-पिपासाही राहू दे
तृप्त कधी ना होऊ दे

मधुप्रेमी हे राहोत असे
अशीच राहो ' मधुशाला ! '

२९

कुशल असे जर साकीवाला
मीही कुशल असे समजा
शुभ–अशुभाचा भेद तो कसा
सांगा धुंदीतच समजावा ?

कुशल कशाला माझे पुसता ?
विचाराच मधुशालेला !

" राम राम " कसला मित्रांनो !
म्हणाच रे " जय ' मधुशाला ! ' "

३०

मधुविक्रेता सूर्य, तर असे
सागर मधुघट, जल मदिरा
मेघ सजूनी आले साकी
भूमिचषक हा मदिरेचा.

धारानृत्यच हे मदिरेचे
रिमझिम रिमझिम रिमझिम रे

मी वृक्ष लता तृण, मी प्राशित
वर्षाऋतु ही ' मधुशाला ! '

३१

तारक-रत्न-सुमण्डित नभ हे
मदिरेचा सुंदर पेला
त्यात भरावी सरळ ठेवुनी
सिंधु-जलाची मधुर सुरा.

मत्त वायुलहरी साकी
ओठावर नाचवी तया

सागरमंडित विश्वच हे
भव्योदात्त जणू ' मधुशाला ! '

३२

ओठावरती कोणताहि रस
असो जिभेवर पण मदिरा
पात्र असो हाती कुठलेही
जणू असे मधुचा पेला.

हरेक मूर्ती माझ्यासाठी
साकीबाला होत असे

नयनांपुढती काहीहि असो—
नयनांमध्ये ' मधुशाला ! '

३३

सजवुनिया सुमनांचे पेले
वृक्ष आज साकीबाला
सुरस सुगंधित मधुपेयांनी
तुडुंब भरिली ही मदिरा

मकरंदांचे समूह लोलुप
धुंद प्राशुनी ती होती

मंद झुलत आन्दोलत धुंदित
उपवन की ही 'मधुशाला!'

३४

आम्रवृक्ष प्रत्येकहि साकी
मधु-मोहर प्रत्येकचि पेला
ओसंडत त्या चषकामधुनी
मादक गंधाची मदिरा.

पिउन तृप्त ही धुंद कोकिळा
कुहूकते पानोपानी

प्रति मधुमासी राईराइत
सजीव होई 'मधुशाला!'

३५

मंदमंद लहरींच्या चषकी
मधुऋतु गंधाची मदिरा
भरभरुनी हा अनिल पाजतो
मधुमस्तीतच झुलणारा

कोमल किसलय नूतन तरुगण
शाखा वेली अन् हिरव्या

झुलत फुलत डोलत तृप्तीने
मधुवन झाले ' मधुशाला ! '

३६

प्रति सुप्रभात साकीबाला
अरुण उषा होते जेव्हा
तारक–रत्न–सुमंडित चादर
विनिमय करुनी घे मदिरा

अनंत किरणांच्या हस्ते ती
पिऊन खग उन्मन गाती

निसर्गात हर प्रभातसमयी
सशब्द होते ' मधुशाला ! '

३७

तिचा धुंदमधुपाश विलगता
समोर अवतरते संध्या
मुरलेली अन् तशीच मादक
सदैव सरते इथे सुरा

व्याप ताप संताप जिवाचे—
पिउन सुरा, सारे सरती

मदलोभी मग देव झोपती
जागृत राही 'मधुशाला!'

३८

मधुविक्रेता काळोखच अन्
शशि सुंदर साकीबाला
कराकरामधुनी चंद्राच्या
नाचविते चांदणपेला

पिऊनिया तो शुद्ध हरपुनी
तारक-दल झिंगती पहा

मधुपांनो पण ध्यान धरा रे—
रात्र नव्हे ही 'मधुशाला!'

३९

जिथे नजर टाकावी तेथे
दृष्टीस पडे मजला मदिरा
जिथे नजर टाकावी तेथे
दृष्टीस पडे मजला पेला.

जेथे पाहिन तेथे माझ्या
नजरेपुढती ये साकी

जेथे जेथे पाहिन तेथे
दृष्टीला दिसते 'मधुशाला!'

४०

साकीरूपे मुरली येई
हाती घेउन मधुपेला
अधरसुधारस मदिरेने तो
काठोकाठ तिने भरला.

योग्येश्वरही मदिरा-मोहे
नटवर नागर रूप धरी

भल्याभल्यांना कशी नाचवी
खट्याळ भारी 'मधुशाला!'

४१

वादक होउन मधुविक्रेता
मधुस्वरांची आणि सुरा
राग-रागिणी साकीबाला
स्वरतंतूंचा भरि पेला

विक्रेत्याच्या इशाऱ्यावरी
लय–आलापी नृत्य करी ( धाव करी )

रसिकांना मधु-पान जणू
वीणाझंकारच ' मधुशाला ! '

४२

चित्रकार होउन ये साकी
चषक तुलीकेचा हाती
त्यामध्ये भरभरुनी पाजी
मधुमदिरा नवरसरंगी

मानसचित्र सुरंगित होई
पुन:पुन्हा प्राशुन मदिरा

नर्तन करिते चित्रपटावर
नयनमनोहर ' मधुशाला ! '

४३

घन:श्याम मधुद्राक्षलतेतुन
पिळून येते ही मदिरा
अरुण-कमल कोवळ्या कळ्यांच्या
सुमनांचा मोठा पेला
    हिन्दोलति लहरी जणु साकी
    रक्तिम मधुने तुडंबुनी
धुंद होतसे हंस प्राशुनी
मानसरोवर ' मधुशाला ! '

४४

हिमपर्वत-पंक्ती द्राक्षलता
विस्तृत हिमजल जणु मदिरा
चंचल सरिता साकीबाला
चषक भरुनिया लहरींचा
    कमनीय किनारा करामधी—
    चषक हिंदळत दिनरजनी
तृप्त प्राशुन डोलति शेते
भारत पावन ' मधुशाला ! '

४५

हृद्रक्ताची वीर पुतांच्या
आज गाळुनी रक्तसुरा
वीर सुपुत्रांच्या शीर्षांचा
करात घेउन मधुपेला.

अतिउदार दानी मधुबाला
सजे आज भारतमाता

स्वतंत्रताही तृषित चंडिका
बलिवेदी ही ' मधुशाला ! '

४६

तुच्छ मानुनी झिडकारियले
मद्यपि म्हणुनी मशिदीने
ठोकरिले श्रीविष्णुपदाने
चषक पाहुनी हातामध्ये.

कुठला आश्रय या भूमीवर
धर्मद्रोहि करंट्याला ?

आश्रयदात्री होउनि जर ना
कुशीत घेती ' मधुशाला ! '

४७

चिरयात्री होउन भटकत मी
सर्वत्र मिळे मज मदिरा
सर्वत्र मिळे प्रिय मधुबाला
सर्वत्र मिळे चषक मला.

सुहृदांनो वसती करण्याचे
कष्ट न मजला मुळि होती

मिळो न मंदिर मशीद न मिळो
हक्काची मज ' मधुशाला ! '

४८

मशिद विलंकृत आणि मौलवी
जपतो रे अल्लाताला.
नटुनीथटुनी साकी येई
सजुनी ये प्राशनकर्ता.

शेख ! कधी का तुलना होते
मशिदीची मधुशालेशी

चिरविधवा ती तव मशीद अन्
चिरसौभाग्यवती ' मधुशाला ! '

४९

शिंग वाजले आणि नमाजी
झणी विसरला अल्लाला
वीज कोसळे तरी मद्यपी
धुंदीतच मधुपानाच्या.

स्पष्ट बोलतो, क्षमा करा—
हे शेख ! पहा या मशिदीला

युगायुगान्तावरिही शिकविल
मंत्रसमाधी 'मधुशाला !'

५०

भिन्न हिंदु अन् मुसलमान पण
एक तयांचा हा पेला
एक तयांचे मदिरालय अन्
एक तयांची ही मदिरा.

जोवर वसती एक तयांची—
मंदिर—मशिदी ते जाती

वैर पेटविति मशीद-मंदिर
एकजीव करि 'मधुशाला !'

५१

शेख, नमाजी किंवा पंडित
जपकर्ता वा कोणि असो
मदिरेसंगे वैरभावना
दृढतम त्याची किती असो.

एकदाच मधुशालेवरुनी—
एकदाच, अन् जाऊ दे !

दावा माझा, कशी न खिळविल
तिथेच त्याला 'मधुशाला !'

५२

अन्य रसांचा स्वाद तोवरी
दूर जोवरी मधु-मदिरा
गर्व अन्य पात्रांचा तोवरि
चषक जोवरी पुढती ना

शेख पुजारी भजती तोवरि
मशिदी-मंदिरि जाउनिया.

अवगुंठन हटवून न पाही
जोवर मादक 'मधुशाला !'

५३

आज सोवळे करो जगत परि
मधुपानाची सक्ति उद्या
नकार देवो आज जगत, पण
चषकाची रे सक्ति उद्या

जन्मू दे गर्वाचा प्रेषित
कोणी जगतामधे पुन्हा

मशीद-मंदिर जिथे आजला
तिथेच होइल 'मधुशाला!'

५४

धडधडते ही यज्ञकुंडसम
मदिराभट्टीची ज्वाला
आसनस्थ दृढतपोनिष्ठसम
प्राशनकर्ता मधुमदिरा.

कुंभ मधूचे मुनिकन्यांसम
मधुबाला घेउन फिरती

तपोवनाहुन उणि का कोण्या
पावन माझी 'मधुशाला!'

५५

सोम–सुरा पूर्वज प्राशियले
मद्य अम्ही म्हणतो त्याला
द्रोण-कलश ज्या म्हणती पूर्वज
आज आम्ही म्हणतो पेला.

धर्म न सोडा वेदप्रणित हा
ठेकेदारांनो श्रुतिच्या

युगे-अनुयुगे वंदनीय ही
नवीन नाही ‘ मधुशाला ! ’

५६

तीच सुरा जी होती सागर
आज मंथुनी हो मदिरा
अनुवंशिक रंभेचे झाले
आज इथे साकीबाला.

देव–दानवां कुणाहि आणा
संतमहंतहि उद्धरती

धमक कुणाची किति नक्की हे
पुरी जाणते ‘ मधुशाला ! ’

५७

ऐकु न येती शब्द कधीही,
'मम चषकाला शिवला हा.'
म्हणे न कोणी इथे कधीही
'याने पेला उष्टवुन दिला.'
सर्व जातिचे जन जमुनी रे
पीताति गुण्यागोविंदाने
काम शेकडो सुधारकांचे
करी एकटी 'मधुशाला!'

५८

श्रम-संकट अन् पाप-तापही
सारे सरती पिउनिया सुरा
मदमस्तीत सदा गुंगावे
धडा हाच रे थोर गड्या.
कशास होसी व्यर्थचि हरि-जन
मधुजन व्हावे हेच बरे
ठोकरती हरि-भक्त तुला पण
स्वागत करिते 'मधुशाला!'

५९

समान सर्वांचे सुस्वागत
करते येथे मधुबाला
अज्ञ-सुज्ञ हा भेदभाव कधि
उरतो का धुंदी चढता?

भेद रंक नी रावांमध्ये–
मदिरालयि कधि होत नसे

साम्यवाद तत्त्वाचि प्रचारक
सर्वप्रथम मम ' मधुशाला!'

६०

पुनःपुन्हा करुनी लाचारी
मागितली नाही आज सुरा
समजु नका म्हणुनी मज कोणी
असा–तसा प्राशनकर्ता!

होऊद्या तर प्रथम साकिची
भीड दूर संकोच जरा

निनादून मम स्वरात सारी
झिंगुन जाइल ' मधुशाला!'

६१

उद्या ? उद्यावर कधी विसंबे
का कोणी प्राशनकर्ता ?
होतसे उद्या निर्जिव अन् ते
पुन्हा हाति धरिती पेला
आज हातिचा गमावला मग
काय भरवसा उद्या असे ?
नाहि उद्याची मम मधुशाला
कुटिल यमाची ' मधुशाला ! '

६२

आज सुसंधी मिळे मला, तर
का न पोटभर पिऊ सुरा ?
आज सुसंधी मिळे मला, तर
का न तुडुंब भरू पेला ?
साकीशी लडिवाळपणा मी
का न पोटभर आज करू ?
एकदाच तर मिळते सर्वां
जीवनरूपी मधुशाला.

६३

चैतन्याचा कंद सखे गे
होवो तव अधरांचा पेला
पुन्हा पुन्हा... अन् पुन्हा भरू दे
तारुण्याची मधु-मदिरा !

आणि सखे माझ्या ओठाशी
येता विसर अलग होणे

अखंड उत्साही मी प्राशक—
मुक्त प्रीतिची 'मधुशाला !'

६४

चषक सुवर्णाचा ग सुंदरी
तुझ्या मुखाचा मजसाठी
मत्त मधूरस–मदिरा भरली
नाचत जी काठोकाठी.

मीच साकि अन् मीच मद्यपी
प्रिये दोन्हिही मीच असे

मिठीत येतो जेथे आपण
तिथे अवतरे 'मधुशाला !'

६५

दोन दिवस ही पाजुनी सुरा
मज कंटाळुनि गेली साकी
कसा तरी भरुनी मग पेला
आदळते माझ्या हाती.

नाजुक नखरे प्रतिकटाक्षही
कधीच ते सारे सरले

कसे तरी कर्तव्य करितसे
आज अशी ही 'मधुशाला!'

६६

प्रीत किती, मधुपान किती
जीवनात माझ्या इवल्याशा
प्रवेशसमयी जीवन-परिचय
देती माझा 'जाणारा'.

स्वागत सवेचि निरोप दोन्ही
समारंभ एके ठायी

उघडताच दारे बंद करी
माझी जीवन 'मधुशाला!'

६७

अद्वैतानंदच हा, जोवर
पेल्यामागुन भरि पेला
निश्चितच हे जीवन, जोवर
सहयात्रिक साकीबाला.

गमावण्याची भीति ग्रासते
प्राप्तीच्या आतूर क्षणी
प्राप्तीचा आनंद नसे मज
प्राप्त होउनी ‘ मधुशाला ! ’

६८

कशास इवला घोट सुरेचा
थट्टा माझी का करता ?
कशास हा इवलासा पेला
दाखवुनी मज हिणवीता ?

भले जिणे या अपमानाहुन
सागर-तृष्णा माझि हरो
कुणी दिली ही सागर-तृष्णा
आणि बिंदुसम ‘ मधुशाला ! ’

६९

म्हणालास रे काय ? न उरली
तव पात्रामध्ये मदिरा
म्हणालास रे काय ? न आता
मादक चषकांची माला.

घोटच घेता तहान वाढे
परंतु उरली नाहि सुरा

तृप्त पिपासेस्तव बोलावुन
तीच वाढवी ' मधुशाला ! '

७०

भालावरती लिखित जेवढे
तेवढीच मिळते मदिरा
भालावरती लिखित जसा रे
चषक मिळे बा जसा तुला.

अकाण्डताण्डव कितिही केले
उपाय बा काहीच नसे

भाग्यामध्ये असे तेवढी
मिळेल तुजला मधुशाला !

७१

खुशाल हो तू कृपण सखे
भरताना माझा पेला
खुशाल दे तू फुटका-तुटका
माझ्यासाठी मधुपेला.

समाधान इतकेच मला की,
होइल पश्चात्ताप तुला !

नसेन येथे मी तेव्हा
आठवेल तुज ही 'मधुशाला !'

७२

मान आणि अपमानहि सरले
घुटका घेता मदिरेचा
मृण्यय पेला हाती येता
सरला प्रश्न प्रतिष्ठेचा.

झिडकारियले साकीने तरि
त्यात गड्या अपमान कसा ?

लाथा खाउन दुनियेच्या मी
आज मिळविली 'मधुशाला !'

७३

क्षीण, क्षुद्र, क्षणभंगुर, दुर्बल
मानव हा मृण्मय पेला
भरली तुडुंब त्याच्यामध्ये
मधु–कटुही जीवन-मदिरा.

मृत्यूच उभा साकीरूपे
अनंत कर फैलावूनी

प्रबल काल रे थोर मद्यपी
आणि संसृती 'मधुशाला !'

७४

घडवुनि आम्हा चषकासम कुणि
तुडुंबली जीवन-मदिरा
धुंदि न रुचली, ओतओतला
तरी आत मधुचा पेला.

जीवन-शूल उठे वर तेव्हा
दडपितसे मधु-चषकाने

प्रथम साकिशी या जगताच्या
द्वंद्व करितसे 'मधुशाला !'

घडवुनि चषकासम आम्हाला
तुडुंबली जीवन-मदिरा
ओसरे न परि धुंदी अजुनी
रिक्त किती केला पेला.

कळ जीवाची उठते तेव्हा...
दडपितसे मधु-पेल्याने

आद्यसाकिशी या विश्वाच्या
जणू झुंजते 'मधुशाला!'

७५

द्राक्षासम देहात आपुल्या
भरली आम्ही मधुर सुरा
काय शेख नरकामध्येही
खितपत पाडिल आम्हाला?

मोह घातला तिने किती तरि
कोणी मदिरा प्राशिल का?

ज्वालेतहि नरकाच्या आम्हा
दिसेल साक्षात् 'मधुशाला!'

७६

यम येइल नेण्याला तेव्हा
खूप झिंगुनी घेइन मी
पीडा कष्ट तशा नरकाचे
सांगा मग का जाणिन मी ?
क्रूर, कठोर, कुटिल, कुविचारी
अन्यायी यमराजाच्या
लाठ्या पाठीवरती पडता
सांभाळिल मज मधुशाला

७७

मधुसंवाद घडीभर केला
मम ओठाशी मदिरेने
एकाकी हातांना क्षणभर
दिली साथ जर चषकाने
काय तुझे नुकसान बा जगा
व्यर्थ मला का दूषविसी ?
( ' उद्ध्वस्त मनासाठी माझ्या )
अरे भंगल्या मनासाठि मम
एक खेळणे मधुशाला !

७८

जीवनपीडा विसरण्यास ही
प्राशन करितो मी मदिरा
मुक्तिस्तव जीवनचिंतेच्या
हाती धरितो मी पेला

हौस, मौज नी स्वादासाठी
जन प्राशन हिजला करिती

परि रोगी मी एक जयाला
एकच औषध मधुशाला !

७९

कालाच्या ओघात सांडते
प्रिये! पहा ही प्राणसुरा
काळाच्या ओघातच खंडित
होतो देहाचा पेला.

हे रूपाली ! रुसला मजवर
यौवनरूपी साकि सखा !

कालौघातच्च सुकून जाते
माझी जीवन मधुशाला !

* * *

सरते सरते सखे प्रतिदिनी
माझ्या प्राणांची मदिरा
रिक्त होतसे सखे प्रतिदिनी
माझ्या देहाचा पेला.

रूपवती गे ! प्रतिदिनि मजवर
यौवनबहर रुसे साकी

शुष्क होतसे, प्रिये प्रतिदिनी
माझी जीवन मधुशाला !

८०

साकीवेशे यम येइल मग
कृष्णमद्य हाती पेला
पिऊन सावध फिरुनी होइन
सुराभक्त हा मतवाला.

ही बेहोशी अंतिम अंतिम
साकी अंतिम हा पेला

पथिका पी रे प्रेमभराने
फिरुन मिळेल न मधुशाला !

८१

देहघटातुन जेव्हा सखये,
जीवन-मधु होई सरता
अंतिम गरल-पात्रसह जेव्हा
येइल साकी सामोरा.

करस्पर्श पेल्याचा, विसरे
मधु-स्वादही जीभ भुले

मंत्र मात्र कानाशी जप तू—
" मधुकण, प्याला, मधुशाला."

८२

मम ओठावर वस्तू अंतिम
असो न तुलसीदल-पेला
जिव्हेवरती वस्तू अंतिम
असो न भागीरथी-सुरा.

शवयात्रेच्या मागे माझ्या
येणाऱ्यांनो ध्यान धरा—

' राम नाम हे सत्य ' ना वदा
म्हणा ' सत्य रे मधुशाला ! '

८३

शोक करावा मम मृत्यूचा
ज्यांच्या अश्रूमधे सुरा
'हाय हाय' त्यांचीच उचित हो
गंधित मद्यपि मतवाला.

खांदा द्यावा त्यांनीच मला
चरण जयांचे डगमगती

दहन करा अन् तेथेच मला
कधि तरि होती मधुशाला.

८४

आणि चितेवर ओता माझ्या
कुंभ न घृतयुत– तर पेला
द्राक्षलतेवर बांधा रे घट
आत नको जल भरा– सुरा.

करशिल माझे श्राद्ध प्रिये तर…
असेच निश्चित करशिल ना ?

निमंत्रुनी मदिरासक्तांना
मुक्तद्वार कर मधुशाला !

८५

नाव विचारियले जर कोणी
सांग फक्त 'प्राशनकर्ता'
काम : सदा भरभरुनी सर्वां....
पेल्यामागुन दे पेला.
विचारली कुणि जात प्रिये तर...
टाक सांगुनी वेड्याची
धर्म : सांग चषकाची घेउन
माळ जप करी मधुशाला !

८६

ज्ञात आगमन होइ यमाचे
घेउन कृष्णजहर पेला
पोथीपंडित पोथि विसरला
साधू स्मरणी विस्मरला
आणि पुजारी विसरे पूजा
ज्ञानी ज्ञानहि विस्मरला
काळ ठेपला दारि विसरला
तरी न मद्यपि मधुशाला !

८७

यम आला नेण्यास तर असो
मधुकुंभाची साथ मला
साकीबाला येवो माझ्या-
संगे घेउन करि पेला.

स्वर्ग-नरक अथवा कोठेही
मनमानेल तिथे तू ने

समान मजला सगळ्या जागा
सहसंगिनि जर मधुशाला !

८८

सुरापान जर अधम, तर तिन्ही
समपापी- साकीबाला
नित्य सुरेचा प्राशक पेला,
प्राशन होणारी मदिरा.

घेउन चल तर माझ्यासंगे
न्याय सुसंगत हाच असे

जेथे बंदी कराल मज मग
तिथेच बंदी मधुशाला !

८९

साकीबाले ! शान्त कधी हो
पिउनी आग जिवाची का ?
कोलाहल " दे.... दे... आणिक "चा
हरेक मद्यपि करतो ना !
    किति आकांक्षा जाणारा मग
    सोडुन जातो नित्य इथे !
मनोरथांची अगणित येथे...
कबर मूर्तिमान् मधुशाला !

९०

ज्या मदिरेचा आसुसलेला—
ती न मिळाली मज मदिरा
ज्या पेल्यासाठी आतुर मी
तो न मिळाला मज पेला.
    ज्या साकीचा ध्यास घेतला
    साकी तीहि मिळली ना
    ( साकी नाहि मिळाली ती )
ज्यासाठी मी जाहलो खुळा
ती न मिळाली मधुशाला.

९१

समोर माझ्या दिसे कधीची
माणिक-लालिम रक्तसुरा
समोर माझ्या दिसे कधीचा
पीत सुवर्णी मधु-पेला.

"आला हाती" या भासाने
किती किती धावत मागे

हाय! परंतू दूर क्षितिजसम
माझ्यापासुन मधुशाला.

९२

कधी निराशेच्या अंधारी
लोप पावतो मधु-पेला
लोपुन जाते प्रभा सुरेची
लोपत मग साकीबाला.

आशेच्या किरणात चमकतो,
पेला क्षणभर उजळुनिया

कोशिंबिर आंधळी खेळते
माझ्यासंगे मधुशाला.

९३

'ये रे पुढती' म्हणून मागे
सारित मज साकीबाला
ओढ लावण्यासाठी सांगुन
दूर सारिते मधु-पेला.

मला न ठावे कुठवर मजला
घेउन ही जाईल अशी

पुढे पुढे मजला ढकलुन ती
मागे सरते ( करते ) मधुशाला.

९४

हाती आला म्हणता म्हणता
हाय निसटतो मधु-पेला
ओठि लागली म्हणता म्हणता
हाय ! सांडते मधु–मदिरा.

मित्रांनो, येऊन तर पहा
मम नशिबाचा खेळ जरा

हाती आली म्हणता म्हणता
तिथेच ठाके 'मधुशाला.'

९५

प्राप्य नसे– तर लुप्त न का मग
होत असे ही मधु–मदिरा
प्राप्य नसे– तर लुप्त न का मग
होत असे हा मधु-पेला.

खचून जाइन इतकी दूर न
निकट न इतकी सहज मिळे

धावधावुनी व्यर्थ शिणवि मज
मृगजळ होउन 'मधुशाला'

९६

प्राप्त न हो, पण लोभावुन का
व्याकुळ करते मज मदिरा ?
मिळे न पण तुटल्या हृदयाला
का व्याकुळ करतो पेला ?

काय नशीबी लिहिले माझ्या
नियतीचा हा खेळ पहा

दूर असावी धार सुरेची
अन् शेजारी मधुशाला

९७

मदिरालयि केव्हाचा बसलो
पिण्यास ना धजलो मदिरा
भरभरतो किति यत्नांनी, परि
कुणी पालथा करि पेला

शिकलो विद्यालयात, ' मानव
समर्थ, दुर्बल भाग्य असे ! '

' भाग्य समर्थ नि दुर्बल मानव '
शिकवी सत्यचि हे ' मधुशाला '

९८

नशीबात खापरी रिकामी
ध्यास लागला पेल्याचा
नशीबात मायाविनि साकी
ध्यास मनी मृगनयनेचा.

कोण करंटा भाग्य जाणण्या–
मध्ये मजसम फसलेला.

सदा नशीबी स्मशान आणिक
मनात माझ्या मधुशाला !

९९

हातापासुन दूरचि ऐशा
पेल्यावर मम प्रेम असे
ओठापासुन दूरचि ऐशा
मदिरेवर मम प्रीत असे

प्राप्तीच्या इच्छेतच गंमत
जी हाती येण्यात नसे.

दूर कदाचित म्हणून मजला
प्रिय इतकी ही मधुशाला

१००

साकीजवळ असे किंचितशी
सत्ता संपत्तीचि सुरा
दुनिया सारी पिण्यास आतुर
घेउन नशिबाचा पेला.

धक्का-बुक्कि, पुढे घुसण्यातच
बहुतेकांचा श्वास सरे.

हा जीवन-संघर्ष कशाचा ?
केवळ गर्दी मधुशाला !

१०१

इवलीशी ही मदिरा साकी
मधुकुंभी तव असताना
चटक पिण्याची लावुन सर्वां
करिसी का उन्मत्त मना ?

खंतावुन मी झुरतो- मरतो
छद्मिपणाने तू हससी

हाय वेदनेसंगे माझ्या
खेळ खेळते ' मधुशाला '

१०२

हे साकी ! धडपडुनी हाती
दिला कुणी जर मधु-पेला
दो बिंदूहुन अधीक नाही
प्राशन केली मी मदिरा.

जीवनभरचे श्रेय खरोखर
मातिमोल दो बिंदूंनी

ठकवण्याचसाठी भोळयांना
पहा जन्मली मधुशाला

१०३

ज्या मदिरेने तहानला मज
ठेवियले ती सुखी असो;
ज्या पेल्याने सदा झुलविले
तो पेलाही सुखी असो !

मत्तमाधवीभक्त कधीही
शाप कुणाला देत नसे.

जिने मला शोकात बुडविले !
सुखी असो ती मधुशाला !

१०४

मद, मदिरा, मधु ऐकऐकुनी
झिंग मनावर चढली ना !
काय दशा मग होइल जेव्हा
ओठाशी येइल पेला...!

येउ नको ग साकी, जवळी
खुळाच होउन जाइन मी

भला असा मी तहानलेला
लखलाभ तुला मधुशाला !

१०५

कशास मागू साकीपाशी
हवी कशाला मज मदिरा ?
कशास घेऊ साकीपासुन
हवा कशाला मज पेला ?

सुरा प्राशुनी धुंदी... ही का
रीत असे मधु-प्रीतीची !

मी तर उन्मन होतो केवळ
शब्द ऐकता 'मधुशाला'

१०६

याचक होउन मागितली मी
प्राप्त न झाली मज मदिरा
याचक होउन मागितला मी
प्राप्त न झाला चषक मला.

जाणुन दुर्बलता मनुजाची
काहि न म्हटले मी तेव्हा

आज परंतू मलाच पाहुन
लज्जित होते 'मधुशाला'

१०७

तृप्त एकदा तुडुंब होतो
इवल्याशा मधु-घोटाने
इवल्याशा मधु-पेल्याने अन्
गोड भाबड्या साकीने.

इवल्या माझ्या त्या विश्वाचा
हेवा स्वर्ग करित होता

अफाट जगती हाय ! लोपली
इवलीशी ती मधुशाला !

१०८

खूप पाहिली मद्यगृहे मी
खूप खूप पाहिली सुरा
तऱ्हेतऱ्हेचा आला माझ्या
करामध्ये मधुचा पेला.

सरस सरसतम सुंदर सुंदर
स्वागत करि साकीबाला

परी न भरली नजरेमध्ये
प्रथम भेटिसम मधुशाला

१०९

थिरकत होती एके काळी
माझ्या ओठावर मदिरा
आन्दोलत एके काळी
माझ्या हातीचा मधु-पेला.

मधु आलिंगन एके काळी
साकी मजला देत असे

स्मशान निर्जन मीच आज तर
होते कधिकाळी मधुशाला

११०

हृद्‌भट्टीच्या ज्वालेतुन मी
अश्रूंची गाळिली सुरा.
पापणिच्या पेल्यातुन गळते
घळघळुनी ती पुन्हा पुन्हा.

नेत्रच साकी आणि गुलाबी
कपोल मद्यपि धुंद कसे

म्हणू नका रे विरही, मी तर
सजीव साक्षात् 'मधुशाला!'

१११

किती त्वरेने रंग बदलते
पहा कशी चंचल मदिरा.
किती त्वरेने झिजतो आहे
हाती येउन मधु-पेला.
किती त्वरेने ते साकीचे
घटते आकर्षण बघ जरा
रूपवती जी होती रात्री
ती न सकाळी 'मधुशाला!'

११२

थेंबाथेंबासाठि तुला कधि,
व्याकुळ करील ही मदिरा
कधी करातुन जाइल निसटुन
हाच तुझा मादक पेला.
ऐक मद्यप्या! गोड साकिच्या
थापांना रे फसू नको
माझेही गुण असेच बाबा
गात असे ही 'मधुशाला!'

११३

पक्ष-पंथ सोडियले तेव्हा
जग म्हटले ' बेछूट ' मला
पेलाही जेव्हा फोडियला
आली मदिरा शरण मला !

ती मानी मधुशाला माझ्या
मागे मागे आज फिरे.

कारण काय ? खरे तर आता
मीच सोडिली ' मधुशाला.'

११४

' मिळे ना सुरा म्हणून प्यालो
वीष; असे मज म्हणू नका
ठोकरला मधु-पेला आणिक
भणंग झालो मी तेव्हा !

दग्ध हृदय आधीच, मस्तिने
ज्वालेतच मी झोकियले

स्मशान मी प्रेमाने वरिले
चरणी असता ' मधुशाला ! '

११५

उदंड आली आणिक सरली
मदिरालयात या मदिरा
असंख्य पेले आले– फुटले
गणती त्यांची कोणाला !

कितेक साकी आल्या-गेल्या
दाद तयांची कुणा असे ?

मधुपांचा तर अखंड स्रोतच
उभी तीच पण ' मधुशाला ! '

११६

किति अधरांचे स्मरण, बिचाऱ्या
धुंद सुरेने ठेवावे ?
किती करांचे स्मरण तरी
वेड्या चषकाने ठेवावे ?

किती चेहरे ध्यानामध्ये
भोळ्या साकीच्या उरती

प्राशनकर्ते कितीक झाले
एकलीच परि ' मधुशाला '

११७

दारोदार भटकलो तेव्हा
आक्रंदत 'मदिरा, मदिरा'
प्राप्त न झाले मदिरालय मज
प्राप्त न झाला मधु-पेला.
मीलन होउनि नाहि मिलनसुख
भाळावर लिहिले माझ्या
ठिय्या देउन बसलो आता
भटकत आहे 'मधुशाला!'

११८

मी मधुशालेमध्ये आणिक
माझ्या हाती मधु-पेला
पेल्यातिल मदिरेतच सुंदर
प्रतिबिंबित साकीबाला.
गोड गोंधळामधेच सारे
जीवनही सरुनी गेले
मधुशाळेमध्ये मी होतो
अन् माझ्यातच 'मधुशाला!'

११९

कोण न येथे मदिराप्रेमी
कोण न प्रेमी चषकाचा
मधुशालेतच या जगताच्या
तऱ्हा किती तरि मदिरेच्या.

स्वेच्छेने मधुपान करूनी
मत्त पहा सगळे येथे

मादक साकी ती एकच अन्
सर्वांची एकच 'मधुशाला!'

१२०

तीच माधवी शान्त खरोखर
जी करते अंतरज्वाला
तोच खरोखर पेला हरक्षण
प्रतिबिंबित जो करी मला.

ती कसली मधुशाला जेथे
विक्री मदिरेची होते

अरे जिथे मस्तीच भेटते
तीच माझि ती 'मधुशाला!'

१२१

मत्तपणा मदिरेचा घेउन
सोडून दिली मी मदिरा
झिंग घेतली पेल्याची अन्
सोडून दिला तो पेला.

साकीशी अन् साकीमध्ये
माझेपण विरुनी गेले

मधुमय मधुशाळेतच झालो
विसरलोच अन् ' मधुशाला ! '

१२२

मधुशालेचे दार ठोठवी
नशिबाचा फुटका पेला
खोल थंड निःश्वास सोडुनी
म्हणत असे प्रत्येक खुळा

' अरे ! अरे ! इवला घुटका मी
यौवनमधुचा प्राशियला

इतक्यातच का बंद अशी ही
माझी जीवन ' मधुशाला ! '

१२३

कोठे स्वर्गिय साकी तो अन्
कोठे ती गंधित मदिरा
कोठे स्वप्निल मदिरालय अन्
कोठे चषक सुवर्णाचा.

मद्यप्यांस मदिरेची किंमत
खरोखरी कधि कळली का ?

जेव्हा फुटला मधु-पेला अन्
कोसळली ती 'मधु-शाला!'

१२४

ज्याला त्याला वाटे अनुपम
त्याच्या काळातिल मदिरा
ज्याला त्याला वाटे अनुपम
त्याच्या हातीचा पेला.

विचारता, वृद्धांना उत्तर
जरि एकच निश्चित समजा,

"अता राहिले 'ते' न पिणारे
'ती' न राहिली 'मधुशाला!'"

१२५

‘ मय ’ शब्दच शुद्धीकृत करुनी
त्याला म्हटले मी ‘ मदिरा ’
‘ मीना ’साठी ‘ मधुपात्र ’ आणि
‘ सागरास ’ म्हटले ‘ पेला ’.

मौलवि, तिलक-त्रिपुंडी पंडित
यांनी का नच दचकावे ?

‘ मय-महफ़िल ’वर माझी सत्ता
नवे स्वरुप ते ‘ मधुशाला ! ’

१२६

पुन्हा पुन्हा किति मर्म नवोनव
या मदिरेने उलगडले
किती भेद या पेल्याने मज
पुन्हा पुन्हा नव दाखविले.

किती अर्थ अन् संकेतांचे
मर्म दाविले साकीने

तरी परंतू मधुपांसाठी
शाश्वत कोडे ‘ मधुशाला ! ’

१२७

सखोल व्यापकता हृदयाची
तितकी खोली चषकाची
मादकता अंतःकरणाची
तीच असे तव मदिरेची.

भावुकता अंतर्हृदयाची
तितकी सुंदर साकि असे

जो जितका मधु-रसिक तयाला
रसमय तितकी 'मधुशाला!'

१२८

ज्या अधरांना स्पर्श करिल, त्या
धुंद करिल माझी मदिरा
हातांना ज्या स्पर्श करिल तर
विक्षिप्त करिल माझा पेला.

दृष्टिभेट होताच साकिची
वेड झणी लागेल तया

खुळा होउनी नाचेलच जो
येउन पाहिल 'मधुशाला!'

१२९

जिभेजिभेवर दिसेल आता
माझी मधु-मादक मदिरा !
प्रत्येकाच्या हाती आता
माझ्या साकीचा पेला.

घराघरातुन चर्चा होइल
माझ्या मधु-विक्रेत्याची

घराघराच्या अंगणात अन्
गंधित माझी 'मधुशाला !'

१३०

सुरेत माझ्या सकल जनांना
गवसलीच त्यांची मदिरा
चषकामध्ये माझ्या त्यांना
चषक तयांचा सापडला.

साकीबालेमध्ये माझ्या
प्रतिबिंबित त्यांची साकी

रुची जयाची तशीच त्याला
दिसलि मूर्तिमान् 'मधुशाला !'

१३१

हे अश्रू का मधुशालेचे ?
छे रे ! ही मादक मदिरा
नयनच का मधुशालेचे हे ?
हा तर वेड्या ! मधु-पेला !
मधुस्मृती का कधिकाळीची
साकी होउन नृत्य करी ?
नाही रे ! कविहृदयच अंगण
जणु विरहाकुल 'मधुशाला !'

१३२

उदासीनता चुरडून किती
कशी गाळिली मी मदिरा
आकांक्षांची राख करूनी
कसा घडविला मी पेला.
सर्व पिणारे पिऊन जातिल
हाय ! कळेल न कधी कुणा
कोसळले किति मनिचे इमले
आणि उभविली 'मधुशाला !'

१३३

विषमय जीवनि तुझ्या विश्व हे !
ही माझी साकीबाला
जरी घेउनी येइल पेला
एखादा मधु-मदिरेचा.
तुझे सुने क्षण थोडेसे जरि
हिने मधुर– रंगित केले
धन्य जन्म समजेल या जगी
माझी प्रियतम 'मधुशाला !'

१३४

सन्मानाने मी आजवरी
जपली ही साकीबाला
सुंदर मधु-कल्पकतारूपी
चषक हिने हाती धरला
लडिवाळपणे अन् मानाने
सांभाळा सुकुमारीला
हे मधुपांनो ! तुमच्या हाती
स्वाधिन करतो 'मधुशाला !'

## परिशिष्ट

'मधुशाले'वर येथे आणखी चार नवीन रुबाया मी देतो आहे. कविता-वाचनाच्या कार्यक्रमांत श्रोत्यांच्या मनोरंजनार्थ मी त्या ऐकवीत असे. अनेकांना त्या पुस्तकात न दिसल्याने आपली निराशा त्यांनी व्यक्त केली आणि यांचाही समावेश 'मधुशाला' पुस्तकात करावा, म्हणून आग्रहही केला. आज त्या मी या परिशिष्टात देत आहे.

'मधुशाला' काव्याचे अनेक वाचक आणि श्रोते एके काळी समजत होते – कदाचित काही अजूनही समजत असतील, की या काव्याचा लेखक रात्रंदिवस मद्याच्या नशेत धुंद असतो. वस्तुस्थिती अशी आहे की, 'मदिरा' नामक द्रवाशी माझा परिचय अक्षरशः नावापुरता आहे. धुंदी-नशा मी नाकारीत नाही. जीवनच एक नशा आहे. कविताही एक नशा-धुंदी आहे. आणखीही बरीच नशा आहे. माझ्या प्रियजनांचा भ्रम दूर करण्यासाठी मी एकदा रुबाई लिहिली होती —

**मी न प्राशितो सुरा कधी, पण**
**पाजवितो ती अन्य जनां**
**स्पर्शितो न मी स्वतः कधी, पण**
**अन्यजनां देतो पेला.**
**पर-उपदेश सुगम हो म्हणुनी**
**तोच पाठ मी घेत असे**
**जात नाहि मी कधि, अन्या पण**
**दुरुन दावितो 'मधुशाला!'**

तरीही सतत प्रश्न येतच होते, "तुम्ही पीत नाही म्हणता, तर मग मदिरेवर लिहिण्याची प्रेरणा कुठून मिळाली?" प्रश्न भाबडा होता, पण प्रामाणिक होता. एक दिवस लक्षात आले की मद्यपी म्हणून प्रसिद्ध असलेल्या कायस्थ कुळातच मी जन्माला आलो आहे. चन्दबर-दाईच्या 'रासो'मध्ये कधी तरी वाचलेला एक छप्पयही आठवला. विचार आला की, पूर्वजांनी केलेल्या मधुपानाचे संस्कार माझ्यावर अनाहूतपणे उमटले तर नसतील! भाबड्या श्रोत्यांना झुलवण्यासाठी एक रुबाई लिहिली.

कायस्थकुळी, जन्मच माझ्या
किती पिढ्या प्राशिती सुरा.
रक्तामध्ये मम देहाच्या
पाउणशे टक्के मदिरा.
हक्क-वारसा माझा आहे
मधु-शालेच्या क्रिडांगणी.
पिढ्यापिढ्यांच्या हस्ते माझ्या
विकली होती ' मधुशाला !'

खरी गोष्ट अशी होती की, शुद्ध आचारविचारासाठी जे अमोढ्याचे पांडे म्हणून प्रसिद्ध होते त्या अमोढा प्रांतातले आम्ही कायस्थ होतो. आणि जर कोणी दारू पिईल तर तो कुष्ठरोगी होईल अशी त्यांच्याबाबत बोलवा होती. दारू न पिण्याची ज्यांनी प्रतिज्ञा केली होती, त्यांच्याच एका वंशजाने दारूची एवढी वकिली करावी हीही नियतीची एक लीलाच म्हटली पाहिजे ! फ्राइड कदाचित म्हणाला असता की, ' मधुशाला 'चा कवी (गायक) याच वंशात जन्माला यायचा होता !'

' मधुशाले 'ची लोकप्रियता ही माझ्या दृष्टीनेही एक समस्याच आहे. हजारो लोकांच्या शेकडो सभांतून मी ' मधुशाला ' ऐकवली आहे. पण आजही कविता ऐकवण्यासाठी जेव्हा मी उभा राहतो, तेव्हा एका स्वरात लोकांकडून ' मधुशाले 'चीच मागणी होते. माझ्या पुस्तकांपैकी ते ' मधुशाला 'च सर्वात अधिक वाचतात. (अशा वेळी) एक गोष्ट सुचली की, दारू जसजशी जुनी होते तसतशी तिची धुंदी वाढते. एक रुबाई लिहिली—

चार दिवस बहुतेकांचा मद
मस्तकि भिनला अन् शमला.
चार दिवस बहुतेकां हाती
भरुन रिक्त झाला पेला.
मुरुन वाढते नशा सुरेची
काळ लोटता, म्हणून रे.
पुराणतर होऊनहि माझी
मादकतम हो ' मधुशाला !'

सरतेशेवटी आणखी एक रुबाई! ज्या वेळी मी 'मधुशाला' लिहिली त्या वेळी माझ्या जीवनात आणि काव्यजगतातही पुत्र किंवा संततिविषयक भावनाकेंद्र नव्हते. आपल्याच इच्छेची सीमा सांगताना मी मृत्यूच्या पलीकडे गेलो. पण 'श्राद्धा'पर्यंतच. "करशिल माझे श्राद्ध प्रिये तर, असेच निश्चित करशिल ना!" जेव्हा स्मृतीचे आधार आणखीही पुढे दिसू लागले तेव्हा तृष्णेचा हात तेथपर्यंतही जाऊन पोहोचला.

**पितृपक्षी मज नको अर्घ्य, पण**
**बाळा! हाती घे पेला.**
**कोठेही जा अन् भरुन घे**
**कमंडलूमध्ये मदिरा.**
**कोणत्याहि स्थानीची भिजु दे**
**माती; मुक्ती मला मिळे.**
**तर्पण–अर्पण मजला कर तू**
**पारायण करुनी 'मधुशाला!'**

परिशिष्टातील या पंक्तीमुळे मधुशाला-प्रेमिकांचा आनंद वृद्धिंगत होईल, अशी आशा आहे.

---

टीप : शहाबुद्दीन घोरीच्या दरबारात आंधळा केला गेलेला पृथ्वीराज चौहान जेव्हा शब्दवेधी बाण मारण्यासाठी "पृथ्वीराज रासो"च्या शेवटच्या भागात बसलेला असतो, तेव्हा (कवी) चन्दबरदाई त्याला धर्मनीतीचा उपदेश करतो. एका छप्पयमध्ये सांगितले आहे की, भिन्न भिन्न जातींचे लोक जेव्हा प्रधान होतात, तेव्हा कसा व्यवहार करतात–

खत्री होय परधान खाय, खंडौ दिखरावै,
साहु होय परधान भरै घर, राज थंभावै,
कायथ होय परधान अहोनिसि रहै पियंतौ
बम्मन होय परधान सदा रखवै निच्चिन्तौ
नाई प्रधान नहि कीजिए, कवि चन्दबिरद साँची चवै।
चहुआन बान गुन सठवै मत चुक्किस मोटे तवै।

# ' मधुशाले 'च्या पहिल्या श्रोत्याच्या आठवणी !

' **मधुशाले** 'चे सर्वप्रथम श्रोते पं. प्रफुल्लचंद्र ओझा ' मुक्त ', यांचे एक संस्मरण ' **मधुशाले** 'च्या एखाद्या आवृत्तीसोबत छापण्याची माझी तीव्र इच्छा होती. ' **मधुशाला** ' लिहिली जात होती तेव्हा ते प्रयाग-मध्येच होते. खूप तीव्रतेने लिहिताच सर्वप्रथम ज्यांना कविता ऐकवीत असे, असे ते निकटवर्ती स्नेही होते. अशा व्यक्तीकडून काही ऐकण्याची ' **मधुशाला** '-प्रेमिकांना नक्कीच उत्सुकता असेल.

माझ्या आग्रहावरून ' **मुक्त 'जींनी** लिहिलेले हे ' **संस्मरण** ' मी १९६६ च्या आवृत्तीत समाविष्ट करीत आहे.]

**—बच्चन**

जीवन काय आणि साहित्य काय दोन्हींसाठी सत्य आणि संयम या आद्य अटी आहेत. जीवनातील खाचखळग्यांच्या मार्गावरून चालताना ' बच्चन 'ने या अटी काटेकोरपणे पाळल्या आहेत, असे मला वाटते. मला असेही वाटते की, व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि चरित्राचा विचार वगळून त्याच्या साहित्याची यथोचित चर्चा होऊच शकत नाही. म्हणून ' बच्चन ' या व्यक्तीबद्दल हे दोन शब्द !

प्रयाग विश्वविद्यालयात एम्. ए. (इंग्रजी) च्या पहिल्या वर्षाचा विद्यार्थी म्हणून हरिवंशराय या नावाने बच्चनशी माझा प्रथम परिचय झाला. त्या वेळी विश्वविद्यालयाने आयोजित केलेल्या कथा-स्पर्धेत त्यांनी भाग घेतला होता.

लौकरच हा परिचय इतका दृढ झाला की, आम्ही दोघे जणू एका कुटुंबातील सख्ख्या भावापेक्षाही जवळचे झालो. सत्याग्रह–आंदोलनांच्या तीव्र प्रवाहातच एम्. ए. पूर्ण होण्याआधीच बच्चनने विश्वविद्यालयाला रामराम ठोकला होता. शिकवण्या आणि उडाणटप्पूपणा करण्यात बेकारीचे दिवस चालले होते. पण बच्चन असे की जीवनाविषयी काही तक्रारच

नव्हती. खूप मेहनत करावी, मनापासून मित्रमंडळीत गप्पा-टप्पा कराव्यात! अत्यंत अभावग्रस्त आणि कटीण दिवसही एका धुंदीत जात होते.

दृढ परिचय होऊनही अनेक वर्षे लोटली. पण विश्वविद्यालयात सुरवातीला ज्या हरिवंशरायची एक कथा मी ऐकली होती, त्याच्या डोक्यात कवितेचे किडेही वळवळत असतील याची मला इतक्या वर्षांत कल्पनाही आली नव्हती. तसे तर ते उदंड ग्रंथप्रेमी होते, साहित्यिकांशी भेटीगाठी होत होत्या, साहित्यावर गरमागरम चर्चाही होत होत्या; पण हे सगळे होत होते ते केवळ एक अभ्यासू, जिज्ञासू या नात्याने; अधिकारी विद्वान किंवा लब्धप्रतिष्ठित साहित्यिक म्हणून नव्हे.

एकदा काही कारणाने बच्चनच्या अनुपस्थितीत मला त्यांची एक खाजगी पेटी उघडावी लागली. मोठ्या सुंदर तीन वह्या मोठ्या निगुतीने पेटीत ठेवल्या होत्या; आणि त्यांत तशाच सुंदर टपोऱ्या अक्षरांत खूप कविता लिहिलेल्या होत्या. सहजच कुतूहलाने मी त्या वह्या उलट्या-पालट्या करून पाहिल्या. कविता तर मला फारच छान वाटल्या. पण माझी पहिली स्वाभाविक प्रतिक्रिया झाली की, साहित्यावर आणि कलेवर मनापासून प्रेम करणाऱ्या बच्चनने त्यांच्या मनाला स्पर्शून गेलेल्या मासिक-पुस्तकांतल्या काही कविता लिहून ठेवल्या असाव्यात. ही सगळी रचना बच्चनचीच आहे आणि अजून अप्रकाशित, हे जेव्हा वहिनींकडून (स्वर्गीय श्यामादेवी) कळले तेव्हा तर माझ्या आश्चर्याला पारावर राहिला नाही. वहिनींना किंवा बच्चनना नकळतच मी त्यांतल्या तीन-चार कविता लिहून घेतल्या, आणि मासिकात प्रसिद्धीसाठी गुपचूप पाठवून दिल्या. काही दिवसांनी जेव्हा कविता छापून आल्या तेव्हा बच्चन फार नाराज झाले. नाराज अशासाठी की, त्यांनी लपवून ठेवलेली गोष्ट मी काय म्हणून छापली ?

पण या घटनेने माझा उत्साह कमी तर झाला नाहीच, उलट वाढला. मी जेव्हा कवि-सम्मेलनाला जात असे, तेव्हा बच्चनही माझ्याबरोबर श्रोता म्हणून असत. मी हळूच कोण्या श्रेष्ठ कवीला सांगत असे की, 'बच्चन फार सुंदर कविता लिहितात. आणि वाचतातही तितकीच सुंदर!' मग ज्येष्ठ लोक आज्ञा करीत. बच्चन माझ्यावर दात-ओठ खात, पण अखेर

त्यांना कविता वाचावीच लागे. अशा रीतीने प्रयागमध्ये तर लौकरच ते प्रसिद्ध आणि लोकप्रिय कवी झाले; आणि अत्यंत वेगाने त्यांचे हे वर्तुळ विस्तारतच गेले.

आता तर गुपित उघड झाले होते. आता लोकांना कळूनच चुकले होते की, बच्चन कविता लिहितात,– खूप छान लिहितात. आणि मोठ्या मधुर, परिणामकारक शैलीने वाचतातसुद्धा! अज्ञातवासाची साधना आता पूर्ण झाली होती. उमरखय्यामच्या रुबायतचा त्याच काळात बच्चनने इंग्रजीद्वारा अनुवाद केला होता. अनुवादित रुबाया लोकांनी ऐकल्या मात्र आणि अनेक लोक अक्षरशः आनंदाने झुलू लागले; मुग्ध-विस्मित झाले.

आणि बच्चनना जणू काही एक हलकीशी धुंदी चढली. खय्यामच्या रुबायांनी त्यांना एक नवीन प्रेरणा दिली; नवीन दृष्टी, नवीन चिंतनधारा दिली. ते आपल्यातच हरवल्यासारखे राहू लागले. दर क्षणी काही तरी विचारात तरी असत नाही तर गुणगुणत तरी! डोळे पाहात असत, पण कोणत्या तरी अतीन्द्रिय अदृश्याच्या पलीकडील; कान ऐकत, पण कोणत्या तरी रहस्यमयी ध्वनीचा झंकार! जवळ असूनही ते दूर वाटत. कधी कधी आम्हा मित्रांनाच काळजी वाटे की, आर्थिक ओढाताण, कठोर संघर्ष आणि तीव्र आत्मक्लेशाचा परिणाम म्हणून तर त्यांची चेतना कोणत्या अनपेक्षित मार्गाने जात नसेल ना!

पण वस्तुस्थिती काही वेगळीच होती. खय्यामच्या रुबायांच्या अनुवादामुळे जे मानसिक मंथन झाले होते त्याच्या अभिव्यक्तीसाठी एका नव्या क्षितिजाचा, नव्या माध्यमाचा, एका नव्या प्रतीकाचा शोध चालू होता. बच्चनच्या दूरदर्शी दृष्टीने जणू ते पाहिले होते, हृदयाने जाणले होते; आणि त्याला लयबद्ध करण्याच्या प्रक्रियेत वाणी दंग झाली होती.

बेकारीचे दिवस! शिकवण्यांचा आधार आणि ही धुंद अवस्था! बच्चनना विचलित झालेले किंवा डगमगून गेलेले मी कधी पाहिले नाही. त्यांचे जीवन नियमबद्ध होते. जबाबदारीला ते घाबरत नसत. किंवा तिच्यापासून दूर पळतही नसत. पण जेव्हा लिहायला बसत, तेव्हा सगळे काही विसरून जात. 'मधुशाले'ची कडवी जेव्हा लिहू लागले तेव्हा कित्येक

आठवडे लिहीतच होते. लिहिण्याची निश्चित अशी वेळ ठरलेली नसे; पण एकदा लिहायला बसले की आपले लिहीतच राहात. बहुधा मी जवळच बसलेला असे. तासन् तास बसून राही, पण कोणीच कोणाशी बोलत नसे. जोपर्यंत ते लिहीत राहतील तोपर्यंत त्यांच्याशी कोणी बोलायचे नाही, अशी त्यांची ताकीद होती; आणि त्यांची तन्मयता पाहून त्यांच्याशी बोलण्याची, त्यांचे चित्त विचलित करण्याची कोणाची इच्छाही होत नसे. तीन दशकांहून अधिक काळ लोटला आहे, पण बच्चन जिथे 'मधुशाले'ची कडवी लिहीत आणि मी शेजारीच मांडी ठोकून बसत असे त्या बच्चनच्या प्रयागमधील घराच्या छतावरची ती खोली अजूनही जशीच्या तशी माझ्या स्मरणात आहे. लिहून झाले की लिहिलेली कडवी ते मला ऐकवीत. वहिनीही कधी कधी जवळ असत. त्या कडव्यांवर आम्ही चर्चा करीत असू. सूचना करीत असू. कधी कडव्यांमध्ये सुधारणाही होत असे. मला आठवते आहे की, 'मधुशाले'ची पंधरा-वीस कडवी एकाच छंदात लिहिली गेली, तेव्हा 'छंद बदलावा' अशी मी सूचना केली होती. कारण एकच एक छंद असेल तर एकरसता ( मोनोटोनी ) येण्याची भीती वाटत होती. पण बच्चनने ते काही ऐकले नाही, आणि आपल्याच योजनेप्रमाणे लिहीत राहिले. आज तर ते सिद्धच झाले आहे की, 'मोनोटोनी' तर आलेली नाहीच, उलट हेच 'मधुशाले'चे एक विशेष आकर्षण ठरले आहे.

याच काळातली एक मनोरंजक घटना स्मरते आहे. एक दिवस मोठ्या तन्मयतेने बच्चन 'मधुशाले'ची कडवी लिहीत होते. मी आपला नेहमीसारखा त्यांच्याजवळच बसलो होतो. अचानक काही घरगुती बोलण्यासाठी म्हणून वहिनी त्यांच्या खुर्चीच्या मागे येऊन उभ्या राहिल्या, आणि वाकून हळूच त्यांना काही तरी सांगितले. आणि तेवढ्यात बच्चन भडकले— "किती वेळा सांगितलं तुला, की मी लिहीत असेन तेव्हा काही बोलत जाऊ नकोस म्हणून ?" वहिनींनी आपल्या नेहमीच्याच शान्त-संयमी स्वरात उत्तर दिले की, "किती वेळा सांगितलं होतं तुम्हांला की मी बोलत असेन तेव्हा काही लिहीत जाऊ नका म्हणून !" आणि आम्ही सर्व खळखळून हसलो! बच्चनचा राग कुठल्या कुठे पळून गेला.

हा आवेगाचा काळ अखेर संपला; ' मधुशाला ' पूर्ण झाली. कविसम्मेलनात ती ऐकवली गेली. पाहतापाहता बच्चनजींची प्रसिद्धी आकाशाला जाऊन भिडली. दूर–जवळच्या गावांतून त्यांना निमंत्रणे येऊ लागली. नकार देणेच त्यांना अशक्य होऊन बसले. केवळ हिन्दी क्षेत्रातच नव्हे तर मधुशाला प्रसिद्ध होताच तिने साऱ्या भारताला झपाटून टाकले. मला आठवते आहे की, ' मधुशाले 'च्या प्रकाशनानंतर थोड्याच दिवसांनी अचानक प्रयागला प्रेमचंदजींची भेट झाली होती. नुकतेच ते मद्रासहून आले होते. बोलण्याच्या ओघात ते तेव्हा म्हणाले होते की, " माहीत आहे तुम्हाला ? मद्रासचे लोक जर कोणा एका हिन्दी कवीला ओळखत असतील तर बच्चनलाच ! "

पण हे सुयश, ही प्रसिद्धी, लोकप्रियता बच्चनसाठी फुलांची शेज नव्हती. त्यांना कंटकमय मार्गानेही जावे लागले—अर्थात काटे त्यांना टोचूच शकले नाहीत ही गोष्ट वेगळी. कारण त्यांच्या सुकीर्तीशी टक्कर घेताना काटेच स्वतः मोडून पडले. इकडे सामान्य लोक त्यांची 'मधुशाला' ऐकून दंग होत; ऐकून त्यांची तृप्तीच होत नसे, पुन्हा पुन्हा ऐकावीशी वाटत असे; आणि दुसरीकडे वृत्तपत्रे मासिकांतून मात्र त्यांच्यावर अत्यंत कठोर आणि कटू टीका प्रसिद्ध होऊ लागली. ही टीका प्रामुख्याने वैयक्तिक, भ्रामक, निराधार आणि आक्षेपात्मक होती. ती वाचून मी तडफडून जाई; आणि बच्चन मात्र हसून सोडून देत. सुरुवातीला एक–दोनदा मी त्या टीकेवर प्रतिवादही केला होता. नंतर या कामापासून बच्चननेच मला परावृत्त केले. आणि आश्चर्य असे की, ' मधुशाले 'वर जसजशी कठोर टीका झाली, तसतशी तिची लोकप्रियता वाढतच गेली. सामान्य लोकांच्या मनात पहिल्या वर्षाइतकीच तीस वर्षांनंतरही तेच कौतुक, आवड आणि उत्कंठा असलेले हिंदीमध्ये ' मधुशाला 'खेरीज अन्य पुस्तक माझ्या पाहण्यात नाही. ज्या कविसंमेलनात बच्चन उपस्थित आहेत आणि त्यांची चांगल्यात चांगली कविता ऐकूनही श्रोत्यांनी अधीर उत्सुकतेने 'मधुशाला' ऐकवण्याचा आग्रह केला नाही, असे कविसंमेलन मी आजवर पाहिले नाही. ' मधुशाला ' जितकी जुनी होते आहे, तितकी तिची धुंदी मोठा गहिरा परिणाम करते आहे.

मी विचार करतो की, बच्चनच्या या प्रसिद्धीचे आणि लोकप्रियतेचे शेवटी गमक तरी काय आहे ?

बच्चन विद्वान आहेत, प्रतिभाशाली आहेत, आणि कुशल शब्द-शिल्पीही आहेत. पण असे ते एकटेच नाहीत. विद्या, प्रतिभा आणि शब्दांच्या कारागिरीचे वरदान तर अनेकांना मिळाले आहे. मला वाटते, सर्वत्र सुलभ नसलेले दोन विशेष गुण बच्चनमध्ये आहेत. एक म्हणजे खरेपणा,– मी म्हणेन प्रामाणिकपणा, आणि दुसरा संयम ! अत्यंत प्रामाणिकपणाने बच्चनने जीवन पाहिले आहे, पारखले आहे; प्रामाणिकपणाने ते जीवन जगले आहेत. आणि जीवनानुभूतीला तितक्याच प्रामाणिकपणाने वाणी दिली आहे; आणि तरीही त्यांनी आपल्या साहित्य-साधनेवर कठोर संयमही ठेवलेला आहे. माझ्यासारख्या जिवलग मित्रालासुद्धा त्यांनी कित्येक वर्षे कविता लिहूनही आपण कविता लिहितो किंवा लिहू शकतो याचा पत्ताही लागू दिला नव्हता. सुयश प्राप्तीच्या प्रसिद्धीनंतरचा अनुशासित संयम तेव्हासुद्धा दुर्मिळच होता. आजच्याबद्दल तर बोलायलाच नको. त्यांची असामान्य प्रतिष्ठा आणि लोकप्रियता आणि त्यांचा स्थिरपणा याचे यापेक्षा अधिक मोठे आणि महत्त्वपूर्ण कारण असणे कठीण आहे, असे मी मानतो. आणि म्हणूनच आपली कविता सुप्रतिष्ठित करण्यासाठी त्यांना प्रयत्न करावे लागले नाहीत, संघर्ष करावा लागला नाही की दीर्घकाळ प्रतीक्षाही करावी लागली नाही. कवितेच्या ओजाने आणि सामर्थ्यानेच त्यांच्या कवितेला प्रतिष्ठा मिळाली. ती प्रकाशात आली तीच मुळी भरभक्कम, परिपक्व आणि सुदृढ पायावरच उभी असलेली. प्रबुद्ध रसिकांनी तिला तळहातावर घेतली, तर सामान्य जनता ती ऐकून आनंदाकुल झाली.

व्यक्तीची वेदना आणि व्यक्तीचा आनंद हा फक्त तिचा आणि तिचा एकटीचाच असतो. समूहात जाऊन तो हास्यास्पद मात्र होतो. कारण पर–पीडा आणि पर–आनंद माणूस स्वतः भोगूच शकत नाही. आणि जे तो स्वतः भोगू शकत नाही, त्याची त्या रूपात अनुभूतीही शक्य नसते. कवीही व्यक्ती असतो. आपला व्यक्तिगत आनंद आणि वेदनाच तो कवितेत मुखर करतो. पण समर्थ कवीच्या काव्याभिव्यक्तीमध्ये असा

काही रेखीवपणा असतो, असा चमत्कार असतो, अशी जादू असते म्हणा हवी तर, की तो आपली वेदना आणि आनंद यांनाही समूहाच्या वेदनेचे आणि आनंदाचे रूप देतो. आणि तेव्हा प्रत्येक वाचक आणि श्रोता अशा कवीची रचना ऐकून-वाचून एकदम आश्चर्यचकित होतो. " अरे, ही तर माझीच व्यथा, माझीच वेदना, कवीला कसा पत्ता लागला बुवा ? "– बच्चनची बहुतेक सर्व कविता व्यक्तिगत आहे. इतकी व्यक्तिगत की, कोणास ठाऊक किती दिवस आणि रात्री, पळ आणि क्षण यांच्या स्मृती त्या कवितेत तरंगित आहेत. पण ती कविता कागदावर उतरली मात्र, ती बच्चनची न राहता सार्वत्रिक, सर्वांची झाली. बच्चनच्या नितान्त व्यक्तिगत दुःख-वेदना, आनंद-उल्हास या जितक्या कधीकाळीं बचनच्या व्यक्तिगत होत्या तितक्याच अनेक वाचक-श्रोत्यांनी स्वतःच्या वैयक्तिक मानल्या आहेत. कवितेच्या यशाचा याहून मोठा पुरावा असू शकत नाही.

' मधुशाले 'पूर्वीही बच्चनचा एक काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला होता; पण त्यांना कवी म्हणून प्रसिद्धी दिली ती ' मधुशाला ' या काव्यसंग्रहानेच! त्यांच्या रचनेच्या प्रत्येक चरणाचा मी साक्षीदार आहे. माझ्या डोळ्यांसमोर त्याचा जन्म झाला आहे. मी त्याचे शैशव, तारुण्य आणि प्रौढावस्थाही पाहिली आहे. बच्चनने त्यानंतरही अनेक अमूल्य कविता लिहिल्या आहेत. अनुभवाच्या आगीत तापून कोंदण झालेल्या कविता, भावनांच्या सखोलतेतून झुलत येणाऱ्या मार्मिक कविता, ज्ञानाच्या गौरवाने तेजस्वी झालेल्या कवितासुद्धा लिहिल्या आहेत. या सर्व कविता अमर राहतील. विश्वसाहित्याचा शृंगार होऊन राहतील. पण ' मधुशाले 'च्या मादकतेला त्या मलिन करू शकणार नाहीत, तिचा मदमस्त आवेश कमी करू शकणार नाहीत.

उमरखैयामचा अनुवाद बच्चनच्या आधीही अनेकांनी केला होता. पण ' मधुशाले 'चा मोती बच्चनच्याच हाती आला. बच्चन कृपण नव्हते म्हणून तर त्यांनी तो मोती सर्वांना मनसोक्त वाटला. लुटवला. हिंदी वाचक तृप्त झाले. प्रसन्न झाले. माझी खात्री आहे की, हिंदी काव्यसाहित्याच्या एका नवीन अध्यायाचा साक्षीदार म्हणून ' मधुशाले 'चे

तारुण्य चिरकाल अक्षुण्ण, अखंड राहील आणि युगायुगांपर्यंत कविताप्रेमी वाचकांना रस-पूर्ण, भाव-विभोर करीत राहील.

– प्रफुल्लचंद्र ओझा–' मुक्त '

आकाशवाणी
पटना
१८-१२-१९६५

# मधुशाला

## रुबायतच्या प्रथम पंक्तींची सूची


| प्रथम पंक्ती | क्रमांक | प्रथम पंक्ती | क्रमांक |
|---|---|---|---|
| मधुरभावना द्राक्षफलांची | १ | थोर घराणी अशी उधळली | २१ |
| तृषा जर तुला, विश्व तापवुनि | २ | सरेल सारे, परंतु राहिल | २२ |
| प्रियतम मदिरा माझि तूच गे | ३ | सदाच दोषी गणला जगती | २३ |
| मधुरभावना द्राक्षलतेतुन | ४ | दोष देइ जो मधुशालेला | २४ |
| मधु-भावांची मधुर-मधुरतम | ५ | उसळताति मदिरालयि ऊर्मी | २५ |
| निघे घरातुन मदिरालयि तो | ६ | वर्षामध्ये एकदाच जगि | २६ |
| पायपीट करण्यातच जीवन | ७ | कोण न जाणे ! मानव येथे | २७ |
| जप सदैव कर तूच मुखाने | ८ | द्राक्षलता या सदा राहु दे | २८ |
| अभिलाषा नित मधुपानाची | ९ | कुशल असे जर साकीबाला | २९ |
| कल कल छल छल ओसंडतती | १० | मधुविक्रेता सूर्य, तर असे | ३० |
| जलतरंगध्वनि भासे, चुंबन– | ११ | तारक–रत्न–सुमण्डित नभ हे | ३१ |
| मेंदि सुरंगित मृदुल करामधि | १२ | ओठावरती कोणताहि रस | ३२ |
| करामधे येण्याच्या आधी | १३ | सजवुनिया सुमनांचे पेले | ३३ |
| लाल सुरेची धार अग्निसम | १४ | आम्रवृक्ष प्रत्येकहि साकी | ३४ |
| दुनियेच्या शीतल मदिरेसम | १५ | मन्दमन्द लहरींच्या चषकी | ३५ |
| पाहिलीस मधुधार सुरेची | १६ | प्रति सुप्रभात साकीबाला | ३६ |
| धर्मग्रंथ होळीत जाळले | १७ | तिचा धुंदमधुपाश बिलगता | ३७ |
| आसुसल्या ओठांनी ज्याने | १८ | मधुविक्रेता काळोखच अन् | ३८ |
| प्रणयीजन साकीचे पुजती | १९ | जिथे नजर टाकावी तेथे | ३९ |
| मंदिरात ना वाजे घंटा | २० | साकीरूपे मुरली येई | ४० |

| प्रथम पंक्ती | क्रमांक | प्रथम पंक्ती | क्रमांक |
|---|---|---|---|
| वादक होउन मधुविक्रेता | ४१ | कशास इवला घोट सुरेचा | ६८ |
| चित्रकार ये होउन साकी | ४२ | म्हणालास रे काय ? न उरली | ६९ |
| घनःश्याम मधुद्राक्षलतेतुन | ४३ | भाळावरती लिखित जेवढे | ७० |
| हिमपर्वत-पंक्ती द्राक्षलता | ४४ | खुशाल हो तू कृपण सखे | ७१ |
| हृद्रक्ताची वीरपुतांच्या | ४५ | मान आणि अपमानहि सरले | ७२ |
| तुच्छ मानुनी झिडकारियले | ४६ | क्षीण, क्षुद्र, क्षणभंगुर दुर्बल | ७३ |
| चिरयात्री होउन भटकत मी | ४७ | घडवुनि आम्हा चषकासम कुणि | ७४ |
| मशिद विलंकृत आणि मौलवी | ४८ | घडवुनि चषकासम आम्हाला | |
| शिंग वाजले आणि नमाजी | ४९ | द्राक्षासम देहात आपुल्या | ७५ |
| भिन्न हिंदु अन् मुसलमान पण | ५० | यम येइल नेण्याला तेव्हा | ७६ |
| शेख, नमाजी किंवा पंडित | ५१ | मधुसंवाद घडीभर केला | ७७ |
| अन्य रसांचा स्वाद तोवरी | ५२ | जीवनपीडा विसरण्यासही | ७८ |
| आज सोवळे करो जगत परि | ५३ | कालाच्या ओघात सांडते | ७९ |
| धडधडते ही यज्ञकुंडसम | ५४ | सरते सरते सखे प्रतिदिनी | |
| सोम-सुरा पूर्वज प्राशियले | ५५ | साकीवेशे यम येइल मग | ८० |
| तीच सुरा जी होती सागर | ५६ | देहघटातुन जेव्हा सखये | ८१ |
| ऐकु न येती शब्द कधीही | ५७ | मम ओठावर वस्तू अंतिम | ८२ |
| श्रम संकट अन् पाप-तापही | ५८ | शोक करावा मम मृत्यूचा | ८३ |
| समान सर्वांचे सुस्वागत | ५९ | आणि चितेवर ओता माझ्या | ८४ |
| पुनःपुन्हा करुनी लाचारी | ६० | नाव विचारियले जर कोणी | ८५ |
| उद्या ? उद्यावर कधी विसंबे | ६१ | ज्ञात आगमन होइ यमाचे | ८६ |
| आज सुसंधी मिळे मला, तर | ६२ | यम आला नेण्यास तर असो | ८७ |
| चैतन्याचा कंद सखे गे | ६३ | सुरापान जर अधम तर तिन्ही | ८८ |
| चषक सुवर्णाचा ग सुंदरी | ६४ | साकीबाले ! शान्त कधी हो | ८९ |
| दोन दिवसही पाजुनी सुरा | ६५ | ज्या मदिरेचा आसुसलेला– | ९० |
| प्रीत किती, मधुपान किती | ६६ | समोर माझ्या दिसे कधीची | ९१ |
| अद्वैतानन्दच हा, जोवर | ६७ | कधी निराशेच्या अंधारी | ९२ |

| प्रथम पंक्ती | क्रमांक | प्रथम पंक्ती | क्रमांक |
|---|---|---|---|
| ' ये रे पुढती ' म्हणून मागे | ९३ | मिळे ना सुरा म्हणून प्यालो | ११४ |
| हाती आला म्हणता म्हणता | ९४ | उदंड आली आणिक सरली | ११५ |
| प्राप्य नसे– तर लुप्त न का मग | ९५ | किति अधरांचे स्मरण, बिचाऱ्या | ११६ |
| प्राप्त न हो, पण लोभावुन का | ९६ | दारोदार भटकलो तेव्हा | ११७ |
| मदिरालयि केव्हाचा बसलो | ९७ | मी मधुशालेमध्ये आणिक | ११८ |
| नशीबात त्यापरी रिकामी | ९८ | कोण न येथे मदिराप्रेमी | ११९ |
| हातापासुन दूरचि ऐशा | ९९ | तीच माधवी शान्त खरोखर | १२० |
| साकीजवळ असे किंचितशी | १०० | मत्तपणा मदिरेचा घेउन | १२१ |
| इवलीशी ही मदिरा साकी | १०१ | मधुशालेचे दार ठोकवी | १२२ |
| हे साकी! धडपडुनी हाती | १०२ | कोठे स्वर्गिय साकी तो अन् | १२३ |
| ज्या मदिरेने तहानला मज | १०३ | ज्याला त्याला वाटे अनुपम | १२४ |
| मद, मदिरा, मधु एकऐकुनी | १०४ | ' मय ' शब्दच शुद्धीकृत करुनी | १२५ |
| कशास मागू साकीपाशी | १०५ | पुन्हा पुन्हा किति मर्म नवोनव | १२६ |
| याचक होउन मागितली मी | १०६ | सखोल व्यापकता हृदयाची | १२७ |
| तृप्त एकदा तुडुंब होतो | १०७ | ज्या अधरांना स्पर्श करिल, त्या | १२८ |
| खूप पाहिली मद्यगृहे मी | १०८ | जिभेजिभेवर दिसेल आता | १२९ |
| थिरकत होती एके काळी | १०९ | सुरेत माझ्या सकल जनांना | १३० |
| हृद्‌भट्टीच्या ज्वालेतुन मी | ११० | हे अश्रू का मधुशालेचे ? | १३१ |
| किती त्वरेने रंग बदलते | १११ | उदासीनता चुरडून किती | १३२ |
| थेंबाथेंबासाठि तुला कधि | ११२ | विषमय जीवनि तुझ्या विश्व हे! | १३३ |
| पक्ष–पंथ सोडियले तेव्हा | ११३ | सन्मानाने मी आजवरी | १३४ |



श्री. बच्चन

हिन्दी काव्य-रसिकांचा सर्वांत प्रिय कवी आहे 'बच्चन!' आणि त्यांची 'मधुशाला' तर गेली तीस वर्षे लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान झालेली आहे. १९३५ मध्ये प्रथम प्रकाशित झाल्यापासून आजपर्यंत या संग्रहाच्या बावीस आवृत्ती निघाल्या असून सुमारे दोन लाख प्रती वाचकांपर्यंत पोहचल्या आहेत. महाकवी पंतजींच्याच शब्दात सांगायचे झाले तर 'मधुशाले'ची मादकता अक्षय आहे.

'मधुशाला' काव्यात मदिरा, पेला, मधुबाला आणि मधुशाला या चार प्रतीकांच्या माध्यमातून कवीने अनेकानेक क्रान्तिकारक, मर्मस्पर्शी प्रणयभाव आणि गूढभाव शब्दबद्ध केले आहेत.

'मधुशाला' काव्याची धुंदी आणि मादकता यांत हरवून जाण्यासाठी रसिकांना हे आग्रहाचे निमंत्रण आहे.